# तरणतलाव विभाग

## केंद्रीय माहितीचा अधिकार - २००५

## कलम ४ (१) (ख) नुसार १७ मुद्यांबाबत जाहीर प्रकटन

**१) अ) संस्थेचे नांव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक, कार्य व सेवेचा तपशील :-**

१. कै.मारोतराव शिंदे तरण तलाव, डॉ.मुस रोड, तलावपाळी, ठाणे (प) - ४०० ६०२, दुरध्वनी क्र.२५३३२०५२.
२. कै.यशवंत रामा साळवी तरण तलाव, मनिषा नगर, कळवा, ठाणे - ४००६०५. दुरध्वनी क्र.२५४०५८९३

**१) ब) रचना :-**




**२) अधिकारी / कर्मचाऱ्यांचे कर्तव्य :-**

१. तरणतलावात पोहण्यासाठी प्रवेश देणे.

२. सभासदांकडून फी वसुल करणे.

३. तरणतलाव पोहण्यासाठी सुस्थितीत ठेवणे.

४. सभासदांना पोहण्यासाठी शिकविणे व सुरक्षा करणे.

५. विद्युत व पाण्याची व्यवस्था करणे.

६. तरणतलावाच्या दुरुस्तीबाबत अहवाल सादर करणे.

७. तरणतलावातील स्नानगृहे व स्वच्छतागृहांची साफसफाई ठेवणे.

८. इतर कार्यालयीन कामे करणे.

...२

**३) निर्णय प्रक्रिया, कार्यपध्दती व जबाबदारी :-**

तरण तलाव विभागाकडील कामांसाठी प्रस्ताव संबंधीत विभागांकडून तयार करण्यात येतात. असे प्रस्ताव उप आयुक्त तथा माहिती व जनसंपर्क अधिकारी यांचेमार्फत मा.आयुक्त यांचेकडे सादर केले जातात. ज्या प्रस्तावांमध्ये खर्चाचा अथवा उत्पन्नाचा समावेश असतो असे प्रस्ताव उप आयुक्त तथा माहिती व जनसंपर्क अधिकारी यांचेमार्फत मुख्य लेखा व वित्त अधिकारी व त्यानंतर मा.अतिरिक्त आयुक्त किंवा मा.आयुक्त यांचेकडे सादर केले जातात.

धोरणात्मक बाब म्हणून निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे सादर करण्यांत येतात. या विभागाचे कामकाज पार पाडण्यासाठी नियमावली व वेळोवेळी केलेल्या ठरावांनुसार कामकाज करण्यांत येते.

**४) नियमित कामे पार पाडण्यासाठी तयार करण्यात आलेली नियत मानके :-**

या विभागाकडील कामकाज पार पाडण्यासाठी प्रचलीत नियमावली, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, मा.स्थायी समिती ठराव व मा.सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार पार पाडण्यांत येतात.

अ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९

ब) १) मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. २९६/१५, दि. १७-०३-२००६
२) मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. २९६/१६, दि. १७-०३-२००६
३) मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३०८०, दि. २७-०२-२००९
४) मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३८, दि. २५-११-२००९
५) मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. २७, दि. २७-०६-२०१४
६) मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३४१, दि. १३-१०-२०१७

**५) नियम, उपविधी, सूचना, अभिलेख ज्याचा वापर नियमित कामे पार पाडण्यासाठी केला जातो :-**

अनुक्रमांक ४ प्रमाणे कार्यवाही करण्यांत येते.

**६) कागदपत्रे, तक्ते यांची सूची :-**

तरणतलाव विभागाकडे खालील प्रमाणे नस्त्या आहेत.

**अ) निविदा नस्ती :-**
१. कै.मारोतराव शिंदे तरण तलाव निविदा सोडा ॲश, ब्लिचिंग पावडर, तुरटी पुरविणेबाबत
२. कै.यशवंत रामा साळवी तरण तलाव निविदा सर्क्युलेशन प्लान्ट चालविणे व निगा व देखभाल करणे.

**ब) इतर नस्त्या :-**

१) तसलमात खर्च देयक नस्ती
२) आदेश/परिपत्रक नस्ती
३) अनामत भरणा चलन नस्ती
४) दैनंदिन भरणा चलन नस्ती
५) ठराव नस्ती
६) किरकोळ रजा अर्ज नस्ती
७) नवीन प्रवेश अर्ज नस्ती
८) माहिती अधिकार नस्ती
९) लेखा आक्षेप नस्ती
१०) टेलिफोन बील नस्ती

**क) रजिस्टर :-**

१) आवक २) जावक ३) अंतर्गत आवक-जावक ४) बजेट रजिस्टर ५) प्रस्ताव रजिस्टर ६) तक्रार नोंदवही ७) भरणा रजिस्टर ८) माहिती अधिकार नोंदवही ९) किरकोळ रजा नोंदवही १०) सभासद नोंदवही ११) हजेरीपट नोंदवही

**७) प्रचलीत कार्यपध्दती ज्यामध्ये लोकप्रतिनिधी व प्रशासन यांचा सहभाग आहे :-**

या विभागाकडील कामकाज लोकप्रतिनिधींशी संबंधीत नाही.

**८) सर्वसाधारण सभा, समित्या याबाबतचा अभिलेख :-**

वर अ.क्र. ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समिती अथवा मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यांत येतात. ठराव पारित झाल्यानंतर सदरचे ठराव संबंधीत नस्तीत ठेवण्यांत येतात.

**९) अधिकारी व कर्मचारी यांची सूची :-**

तरण तलाव विभागाकडे खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत,

| **कै.मारोतराव शिंदे तरण तलाव** | | | **कै.यशवंत रामा साळवी तरण तलाव** |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **संख्या** | **संख्या** |
| १ | व्यवस्थापक | १ | - |
| २ | अ वर्ग लिपिक | १ | १ |
| ३ | लिपिक | १ | २ |
| ४ | जलनिर्देशक | ७ | ७ |
| ५ | अटेंडन्ट | १ | - |
| ६ | पंप ऑपरेटर | १ | - |
| ७ | सहाय्यक पंप ऑपरेटर | १ | - |
| ८ | महिला अटेंडन्ट | १ | - |
| ९ | शिपाई | २ | - |
| १० | बिगारी | ४ | - |
| ११ | सफाई कामगार | ५ | ५ |

**१०) अधिकारी व कर्मचारी यांना मिळणारे वेतन :-**

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **वेतन (बेसीक + ग्रेड पे ) + नियमानुसार इतर भत्ते** |
|---|---|---|
| १ | व्यवस्थापक | ९३००- ३४८००+४२०० |
| २ | अ वर्ग लिपिक | ५२००-२०२००+३२०० |
| ३ | लिपिक | ५२००-२०२००+२७०० |
| ४ | जलनिर्देशक | ५२००-२०२००+२४०० |
| ५ | अटेंडन्ट | ५२००-२०२००+२४०० |
| ६ | पंप ऑपरेटर | ५२००-२०२००+३३०० |
| ७ | सहाय्यक पंप ऑपरेटर | ५२००-२०२००+१९०० |
| ८ | महिला अटेंडन्ट | ५२००-२०२००+२४०० |
| ९ | शिपाई | ५२००-२०२००+१९०० |
| १० | बिगारी | ५२००-२०२००+१८०० |
| ११ | सफाई कामगार | ५२००-२०२००+१८०० |

**११) विभागासाठी दिलेली अंदाजपत्रकीय तरतूद, नियोजीत कामे, खर्चा व संस्थांची नावे :-**
**(सन २०१७-२०१८)**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | तरतुद | झालेला खर्च | शिल्लक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यालयीन खर्च | रु. ५५००००/- | रु. २५६२१/- | रु. २९३७९/- | |
| २ | कै.मारोतराव शिंदे तरणतलाव निगा व देखभाल व दुरुस्ती | रु.१,००,००,०००/- | रु.७,९२,३०७/- | रु.९२,०७,६९३/- | |
| ३ | कै.यशवंत रामा साळवी तरणतलाव निगा व देखभाल व दुरुस्ती | रु.२,२५,००,०००/- | रु.७,९६,१६२/- | रु.२,१७,०३,८३८/- | |
| ४ | दुरध्वनी व भ्रमणध्वनी खर्च | रु.५०,०००/- | रु.१६,२४८/- | रु.३३,७५२/- | |

**१२) शासनाकडून मिळालेले अनुदान, खर्च, लाभार्थींची नांवे :-**

या विभागासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही. त्यामुळे खर्च व लाभार्थींची नांवे याबाबतची माहिती निरंक आहे.

**१३) परवानग्या व सूट या बाबतची माहिती :-**

या विभागाकडून कोणत्याही परवानग्या अथवा सूट दिली जात नाही. त्यामुळे याबाबतची माहिती निरंक आहे.

**१४) अशी माहिती की जी इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये संकलीत स्वरुपात दर्शविण्यात आली आहे :-**

महापालिकेबाबत सर्व महत्वाची माहिती महापालिकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**१५) नागरीकांना माहिती मिळण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या सुविधा, कार्यालयीन वेळ :-**

तरणतलाव विभागाचे कामकाजाची कार्यालयीन वेळ सकाळी ७-०० ते १०-०० तसेच दुपारी ३-०० ते रात्रौ ७-०० अशी आहे. तरण तलाव विभागाकडील माहिती मिळण्यासाठी नागरीकांना सकाळी ८-०० ते १०-०० तसेच दुपारी ३-०० ते सायंकाळी ५-४५ अशी वेळ उपलब्ध आहे.

**१६) माहिती अधिकाऱ्यांची नावे, पद व इतर माहिती :-**

| अ.क्र. | विभागाचे नांव | माहिती अधिकाऱ्याचे पदनाम | अपिल अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|
| १ | तरण तलाव | व्यवस्थापक | माहिती व जनसंपर्क अधिकारी |

**१७) इतर माहिती :-**

या विभागाकडील इतर माहिती निरंक आहे.